## दिवसभरात कोरोनाच्या ३२२ नवीन रुग्णांची नोंद

**मुंबई :** कोरोनाची चौथी लाट रोखण्यात पालिकेला यश आले असून रोज आढळणाऱ्या रुग्ण संख्येत घट होत आहे. रविवारी दिवसभरात ३२२ नवीन रुग्णांची नोंद झाल्याने बाधित रुग्णांची संख्या ११ लाख २४ हजार ८१३ वर पोहोचली आहे. तर दिवसभरात दोन रुग्णाचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या १९ हजार ६५१ वर पोहोचली आहे.

# अतिवृष्टीबाधितांना यंत्रणांनी तातडीने सहाय्य करावे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : मराठवाडा विभागीय बैठकीत सर्वंकष आढावा

**वार्ताहर/औरंगाबाद**

अतिवृष्टीने नुकसान झालेल्या प्रत्येकाला आवश्यक ते सहाय्य करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी येथे दिले. तसेच औरंगाबाद शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या योजनेच्या दुरुस्तीसाठी २०० कोटींचा निधी देण्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिवृष्टी, पीक परिस्थिती, विकासकामे तसेच इतर विविध बाबींसंदर्भात विभागीय आढावा बैठक घेतली. या बैठकीस केंद्रीय रेल्वे, कोळसा व खाणी राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, खासदार इम्तियाज जलील, आमदार हरिभाऊ बागडे, प्रदीप जैस्वाल, अब्दुल सत्तार, संजय शिरसाठ, संदीपान भुमरे, अतुल सावे, माजी मंत्री रामदास कदम तसेच सर्व अधकारी उपस्थित होते.


मुख्यमंत्र्यांनी मराठवाडा विभागातील अतिवृष्टी आणि पीक परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निकषानुसार मदत देण्यासह नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचा शासनाचा विचार असल्याचे सांगितले. बाधितांना नियमानुसार देय असलेली आर्थिक मदत, इतर सहाय्य तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आदेश त्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री म्हणाले, ''शेतकरी हिताला शासनाचे प्राधान्य असून शेती आणि शेतकरी विकासाच्या विविध योजना अधिक गतिमानतेने लोकांपर्यंत पोहचवाव्यात. शेतीव्यतिरिक्त अर्थाजनाच्या विविध स्त्रोतांची उपलब्धता करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावेत. तसेच पारंपरिक शेतीसोबतच सेंद्रीय शेती, क्लस्टर शेती या संकल्पना तसेच इतर राज्यांमध्ये, देशांमध्ये आधुनिक पद्धतीने करण्यात येत असलेल्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर शेतीत करण्यास मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी प्राधान्य द्यावे. खाजगी सावकारीला आळा घालण्यासह बँकांकडून कर्ज प्रस्ताव वेळेत मंजूर व्हावे यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत असे आदेश देतानाच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना सर्व शासकीय योजनांचे लाभ देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. नांदेड-जालना समृद्धी महामार्ग लवकरच बांधण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### इतर महत्वाचे निर्णय

- औरंगाबाद येथे क्रीडा विद्यापीठ स्थापन करणार
- औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी देणार
- लातूर कृषी महाविद्यालयाची जमीन जिल्हा रुग्णालयास देणार

# सावधान; बीए व्हेरिएंट बळावतोय



### राज्यात १४१ नवीन रुग्णांची नोंद

**प्रतिनिधी/मुंबई**

कोरोनाला उतरती कळा लागली असतानाच कोरोनाचा नवीन व्हेरिएंट बीए ४, बीए ५ व बीए २.७५ व्हेरिएंटचा धोका वाढला आहे. रविवारी, राज्यात बीए ४ व बीए ५ चे ६२ व बीए २.७५ व्हेरिएंटचे तब्बल १४१ बीए व्हेरिएंटच्या रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे बीए व्हेरिएंट बळावतोय असून योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने केले आहे.

पुणे येथील बी जे वैद्यकीय महाविद्यालयाच्या अहवालानुसार, राज्यात बीए. ५ चे ५२ आणि बीए. ४ चे १० रुग्ण आढळले आहेत. तर बीए. २.७५ व्हेरीयंटचे देखील ७९ रुग्ण आढळले आहेत.

बीए.२.७५ चे ८ रुग्ण सोलापूर येथील तर उर्वरित सर्व रुग्ण पुणे येथील असून पुणे इन्साकॉग प्रयोगशाळांमध्ये यांची तपासणी झाली आहे. या सर्व रुग्णाचा सखोल साथरोग शास्त्रीय पद्धतीने तपासणी करण्यात आहे. दरम्यान, राज्यात आतापर्यंत आढळलेल्या बीए. ४ आणि बीए. ५ रुग्णांची संख्या २५८ तर बीए. २.७५ रुग्णांची संख्या १९९ झाली आहे.

### जिल्हानिहाय बीए. ४ आणि ५!

पुणे -१६३, मुंबई -५१, ठाणे - १६, रायगड - ७, सांगली - ५, नागपूर -८, पालघर - ४, कोल्हापूर - २.

### जिल्हानिहाय बीए. २ .७५!

पुणे -१२७, नागपूर - ३३, यवतमाळ - १२, सोलापूर -८, मुंबई -५, अकोला - ४, ठाणे - ३, वाशिम - २, अमरावती, बुलढाणा, जालना, लातूर, सांगली - प्रत्येकी १ रुग्ण.

## लेखी परीक्षेत डमी बसवलेल्या तरुणाला अटक

**मुंबई :** पोलीस शिपाईपदी नियुक्तीपत्र घेण्यासाठी आलेल्या दीपक तुकाराम घोडके या २२ वर्षांच्या तरुणाला भोईवाडा पोलिसांनी अटक केली. दीपकने लेखी परीक्षेत हजर राहणे अपेक्षित असताना त्याच्या वतीने दुसऱ्या व्यक्तीने ती परीक्षा दिली होती. हा प्रकार उघडकीस येताच दीपकसह अज्ञात व्यक्तीविरुद्ध भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच दीपक घोडके याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याविरुद्ध कट रचून बोगस दस्तावेज सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

## सीएसएमटी–कल्याण, कसारा, पनवेल मार्गावर नवीन फेऱ्या वाढविणे अशक्य



**प्रतिनिधी/ मुंबई**

ठाणे ते दिवा दरम्यान पाचवी, सहावी मार्गिका काही महिन्यांपूर्वी प्रवाशांच्या सेवेत आली. यानंतर साधारण लोकल फेऱ्या तशाच ठेवत एसी लोकल फेऱ्यांमध्ये रेल्वे प्रशासनाकडून वाढ करण्यात आली. यामुळे प्रवाशांकडून तीव्र नाराजी व्यक्त करत साधारण लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी जोर धरू लागली. मात्र याबाबत दुर्लक्ष करत प्रशासनाने एसी लोकल फेऱ्यांवर भर दिला. अशातच येत्या ऑक्टोबरपासून मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर नवीन वेळापत्रक लागू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या नियोजनात प्रवाशांना दिलासा मिळणार अशी अपेक्षा असतानाच सीएसएमटी-कल्याण, कसारा, खोपोली आणि सीएसएमटी-पनवेल हार्बर, ट्रान्स हार्बर मार्गावर नवीन फेऱ्या वाढविणे अशक्य असल्याचे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले आहे. यामुळे या मार्गावरील प्रवाशांच्या मनस्तापात आणखी भर पडली आहे.

वातानुकूलित फेऱ्या वाढवण्यासाठी सामान्य लोकलच्याही फेऱ्या रद्द करण्यात आल्या. आता ऑक्टोबर २०२२ पासून लागू होणाऱ्या नवीन उपनगरीय वेळापत्रकातही सामान्य लोकल प्रवाशांना फारसा दिलासा नसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाला विचारले असता अनेक महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण होणे बाकी आहे. याशिवाय नवीन फेऱ्यांसाठी उपलब्ध नसलेली जागा, वेळेत उपलब्ध होऊ न शकलेल्या नवीन मार्गिका यामुळे साधारण लोकलच्या फेऱ्या एवढ्यात वाढवणे शक्य नसल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

### नेरुळ ते खारकोपर या चौथ्या मार्गावर लोकल फेऱ्या वाढणार

नवीन वेळापत्रकात नेरुळ ते खारकोपर या चौथ्या मार्गावर फेऱ्या वाढवण्याचा विचार मध्य रेल्वेकडून केला जात आहे. सध्या या मार्गावर दररोज ४० फेऱ्या होतात. आणखी फेऱ्या वाढवण्यासाठी तीन विनावातानुकूलित लोकल चेन्नईतील रेल्वेच्या इंटिग्रल कोच कारखान्यातून मध्य रेल्वेवर दाखल होणार असल्याचे मध्य रेल्वे विभागीय व्यवस्थापक शलभ गोयल यांनी सांगितले.

## शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुखपदी केदार दिघे

**प्रतिनिधी/मुंबई :** शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांची शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाणे हा बालेकिल्ला आहे. ठाणे जिल्ह्यात मुख्यमंत्री शिंदे यांच्यामुळे शिवसेनेला जबर फटका बसला आहे. त्यावर उपाययोजना म्हणून आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आनंद दिघे यांच्याच सहकारी असलेल्या अनिता बिर्जे यांना शिवसेना उपनेतेपद देण्यात आले आहे.



ठाणे लोकसभा मतदारसंघातील खासदार राजन विचारे हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहेत. विचारे यांनी रविवारी दुपारी केदार दिघे, अनिता बिर्जे यांच्यासह शेकडो शिवसैनिकांसह मातोश्री येथे जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. दिघे यांच्यासोबतच प्रदीप शिंदे यांच्यावर ठाणे शहरप्रमुखपदाची तर चिंतामणी कारखानीस यांची ठाणे विभागीय प्रवक्तेपदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

## वीज खंडित करण्याची धमकी देत फसवणूक

**मुंबई :** वीज खंडित करण्याची धमकी देऊन एका ६४ वर्षांच्या वयोवृद्ध महिलेची दोन लाख ३५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार दादर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी या ठगाविरुद्ध शिवाजी पार्क पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे.

यूनियन बैंक Union Bank of India

केलेडोनिया बिल्डिंग, ६ व्ही मंजिल , ए विंग , सहर रोड, अँधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९.

**भाडेपट्टी वर परिसर आवश्यक**

आमच्या सांताक्रूझ पूर्व शाखेसाठी व्यावसायिक जागा आवश्यक आहे, तयार ताबा, मुख्य रस्त्यावरील जागा आणि तळमजला श्रेयस्कर आहे.

**तपशीलांसाठी कृपया बँकेच्या वेबसाइटला भेट द्या**

www.unionbankofindia.com किंवा www.tenders.gov.in वर संपर्क करा

विहित नमुन्यात बोली सादर करण्याची शेवटची तारीख १८.०८.२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत.

सही/-
क्षेत्र प्रमुख

ART HOUSING FINANCE Own your dreams

**आणखी एक शाखा**

आर्ट हाउसिंग फायनान्सने पुण्यात आणखी एक शाखा सुरू केली आहे


कनिष्ठ आणि मध्यमवर्गीयांना लक्षात घेऊन गृहकर्जासाठी योगदान देण्यासाठी आर्ट ने पुण्यात आपली सत्तावीस शाखा सुरू केली आहे. आर्ट ने कनिष्ठ मध्यमवर्गाला लक्षात घेऊन या दिशेने योगदान देण्यासाठी पावले उचलली आहेत. पुण्यातील ही नवीन शाखा घर खरेदी आणि बांधकामासाठी परवडणाऱ्या दरात कर्ज उपलब्ध करून देईल.

आर्ट ने आपले कार्यालय १–८–२०२२ रोजी कार्यालय क्रमांक २२८, दुसरा मजला, मयूर ट्रेड ४५३३/४, मुंबई पुणे – ४११०१६ येथे सुरू केले आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत. | CIN: L51909MH2002PLC135594 | E-mail id: info@mcxindia.com | www.mcxindia.com

MCX METAL & ENERGY Trade with Trust



**ऑप्शन्स**

जोखीम व्यवस्थापनाचे लवचिक साधन – ऑप्शन्स हे किंमतीच्या विम्यासारखे आहेत आणि त्यामुळेच हेजिंग आणि जोखीम व्यवस्थापनासाठी योग्य आहेत.

एमसीएक्सवर ट्रेडिंगसाठी उपलब्ध

सोनं | चांदी | क्रुड तेल | नॅचरल गॅस | तांबे | निकेल | जस्त

**३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीकरीता अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार**

(₹ लाखांमध्ये; प्रत्येक समभागाच्या माहिती व्यतिरिक्त)

| तपशील | एकत्रित | | | | अलिप्त | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३० जून २०२२ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० जून २०२१ अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० जून २०२२ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० जून २०२१ अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित |
| १. प्रचालनातून मिळालेले उत्पन्न | १०,८७९ | १०,६४६ | ८,७६० | ३६,६८१ | ९,८५९ | ९,६११ | ७,७६३ | ३२,९७८ |
| २. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक बाबी आणि असोसिएटच्या नफ्याच्या भागापूर्वी) | ५,२७० | ६,५०२ | ५,१४७ | २०,५७४ | ४,३२३ | ५,७०० | ४,४५६ | १७,९४० |
| ३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक बाबी आणि असोसिएटच्या नफ्याच्या भागानंतर) | ५,२०६ | ४,४४७ | ५,१४० | १८,४०५ | ४,३२३ | ३,६५७ | ४,४५६ | १५,८९७ |
| ४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा | ४,१४६ | ३,६५३ | ३,९८० | १४,३४५ | ३,२६३ | २,८७१ | ३,२९६ | ११,८४६ |
| ५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता व्यापक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)] | ४,२४५ | ३,७१४ | ३,७६३ | १४,०६२ | ३,३०५ | २,८९९ | ३,१२५ | ११,५७० |
| ६. समभाग भांडवल (₹१०/– प्रति शेअर) | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ |
| ७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार) | – | – | – | १,३६,७११ | – | – | – | १,५०,४३० |
| ८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/– प्रत्येकी)* | | | | | | | | |
| मूलभूत (₹) | ८.१४ | ७.१८ | ७.८२ | २८.१८ | ६.४१ | ५.६४ | ६.४८ | २३.२७ |
| सौमिकृत (₹) | ८.१४ | ७.१८ | ७.८२ | २८.१८ | ६.४१ | ५.६४ | ६.४८ | २३.२७ |

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१) वरील तक्ता; सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत बीएसईसोबत दाखल करण्यात आलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप बीएसईचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि कंपनीचे संकेतस्थळ www.mcxindia.com वर उपलब्ध आहे.

२) दिनांक ३० जुलै २०२२ रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता मिळाली आहे.

**मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडकरिता,**
स्वाक्षरी/–
**पी. एस. रेड्डी**
व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

*स्थळ: मुंबई । दिनांक: ३० जुलै २०२२*